## :: प्रेस नोट ::

दि. १६/१२/२०२२

आरोपी लोकसेवक - श्री.किशोर अर्जुनराव जगदाळे, वय ४० वर्ष, वाहतुक नियंत्रक, रा.प.बीड, रा.स्वराज्य नगर, बीड, ता.जि.बीड यांना ३००००/- ( तीस हजार रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई .

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | शिवाजीनगर, बीड |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री.किशोर अर्जुनराव जगदाळे, वय ४० वर्ष, वाहतुक नियंत्रक, रा.प.बीड, रा.स्वराज्य नगर, बीड, |
| लाचेची रक्कम | ३००००/- रुपये ( तीस हजार रुपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक १५/१२/२०२२ रोजी तकारदार यांनी तक्रार दिली की, तकारदार महिला यांचे विरुध्द बीड आगार येथे सुरु असलेल्या चौकशीत तकारदार यांना बडतर्फ न करणे व कर्तव्यावर परत घेण्यासाठी वरिष्ठांशी बोलुन मदत करण्यासाठी वाहतुक नियंत्रक श्री.जगदाळे हे १२००००/- ( एक लाख वीस हजार रुपये ) लाचेची मागणी करत आहेत. तकारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तकार दिली.<br>सदर तकारीच्या अनुषंगाने दिनांक १६/१२/२०२२ रोजी पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री.जगदाळे यांनी तकारदार यांचे कडे १२००००/-रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता म्हणुन ३००००/- ( तीस हजार रुपये) लाच रक्कम त्वरीत स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्यावरुन आज दिनांक १६/१२/२०२२ रोजी सापळा लावला असता आलोसे श्री.जगदाळे यांना पंचासमक्ष ३०००० /- रुपये पहिला हप्ता म्हणून लाच रक्कम तकारदार यांच्याकडुन स्विकारतांना रंगेहाथ पकडले.<br>आलोसे श्री.किशोर अर्जुनराव जगदाळे, वय ४० वर्ष, वाहतुक नियंत्रक, रा.प.बीड, रा.स्वराज्य नगर, बीड, यांनी पंचा समक्ष तकारदार यांचे कडे १२००००/-रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता म्हणुन ३००००/- ( तीस हजार रुपये) लाच रक्कम स्विकारली म्हणून त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे शिवाजीनगर बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद,श्री.विशाल खांबे,अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि औरंगाबाद, श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, बीड यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.रविंद्र परदेशी,पोलीस निरीक्षक , सह श्री.अमोल धस, पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार श्री. श्रीराम गिराम, श्री.अमोल खरसाडे, श्री.भरत गारदे, श्री. अविनाश गवळी, चालक अंमलदार श्री.गणेश मेहत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड

संकेतस्थळ :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**
2) **dyspacbbeed@gmail.com**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि कमांक :- १०६४

दुरध्वनी कमांक :- ०२४४२-२२२६४९

व्हॉटस अप क. :- ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ९९२३०२३३६१

अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ८७८८६४४९९४

पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड :- ९३५५१००१००


( शंकर शिंदे )

पोलीस उप-अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.